**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नाव : रविंद्र भगवान सुरकुले,
वय : ३४ वर्षे,
पद : पोलीस हवालदार बक्कल नं.२४८०, घोडेगाव पोलीस स्टेशन.
राहणार : मंचर, ता. आंबेगाव, जि.पुणे.

**सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी. एस. वाळके**

१. घटनेच्यावेळी माझी नेमणुक पोलीस नाईक म्हणुन घोडेगाव पोलीस स्टेशन येथे होती. नेमणुकीस असताना मी गु.र.नं.२३०/२०२१ या गुन्ह्याचा तपास केला. मी तपासा दरम्यान घटनास्थळाचा पंचनामा तयार केला.

२. आता मला दि.२०/१०/२०२१ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्यास **निशाणी क्र.४२** देण्यात येते. आता मला दि.२०/१०/२०२१ रोजीचा घटनास्थळ नकाशा दाखविला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्यास **निशाणी क्र.४३** देण्यात येते.

३. त्यानंतर मी साक्षीदारांकडे तपास केला. साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. गुन्हयाचा तपास पुर्ण करुन आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. तपासाअंती आरोपीने मनाई आदेश असताना फ्लेक्स, बॅनर लावुन गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर नाही. आरोपीचा गैजहजेरी माफीचा अर्ज अभिलेखावर दाखल आहे.

**सरतपास पुर्ण.**

आरोपीतर्फे वकीलांच्या लेखी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-
(स्नेहा सुनिल पुळूजकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,
ता. आंबेगाव, जि. पुणे.

दि.१५/०७/२०२६
घोडेगाव